# को.ए.सो. माध्यमिक विद्यामंदिर, माणकुले

आपल्या कोकण एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यामंदिर, माणकुले ता. अलिबाग या शाळेचा एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१६ चा निकाल ८८.८९% लागला एकूण २७ विद्यार्थ्यांपैकी २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेतून प्रथम येण्याचा मान कु. हर्ष तुकाराम पाटील याने ८६.६०% गुण संपादन करून मिळवला. कु.राजेश रामचंद्र म्हात्रे याने ७९.२०% गुण मिळवून दुसरा क्रमांक तर कु.शुभम दिलीप पाटील याने ७८.२०% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविला. सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे चेअरमन मा.श्री. रामभाऊशेट पाटील, शाळा समितीचे सर्व सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीकोनातून विद्यामंदिरात शालेय शिक्षणाबरोबर विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जाते. अहवाल वर्षी योग दिन, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन केले. अहवाल वर्षी योग दिन, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन केले.

संस्थेचे माजी अध्यक्ष लोकनेते ॲड दत्ता पाटील स्मृतिदिना निमित्त शाळेत हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन केले व जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. शाळेचे सभापती मा.श्री. रामभाऊशेट यांनी मा.दादांच्या आठवणी आपल्या भाषणत व्यक्त केल्या. मा.अध्यक्ष श्री. संजय दत्ता पाटील यांनी आपले पिता आदरणीय लोकनेते ॲड. दत्ता पाटील अर्थात दादांच्या जयंतीनिमित्त रू. एक लाख एक हजार रूपयांचा धनादेश शाळेच्या बांधकामाकरीता दिला आहे.

शाळेची पावसाळी सहल श्रीक्षेत्र सिद्धेश्वर येथे गली होती. संकल्प विद्यानिधी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. कोळवणकर सर यांच्या हस्ते शाळेतील गरीब व गरजू इ. ५ वी ते ९ वी च्या एकूण १० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १५००-/ रू शिष्यवृत्ती देण्यात आली. याबाबत श्री. पी.के. पाटील सर मदत करतात. शाळेतील किशोरवयीन मुलींसाठी ७ वी ते १० वी च्या विद्यार्थिनीसाठी आरोग्य शिबीर घेण्यात आले. पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या विविध आजार व त्यावरील उपाय याचे मार्गदर्शन डॉ. मनोज पाटील यांनी केले.

इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना निकाल वृद्धीसाठी रोज जादा तासिका, प्रत्येक आठवड्यात चाचणी परीक्षा, सराव परीक्षा इत्यादी उपक्रमा राबविले जातात. हा अहवाल सादर करताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.



कु. पाटील हर्ष तुकाराम
एस. एस.सी. (८६.६०%)



कु. म्हात्रे राजेश रामचंद्र
एस. एस.सी. (७९.२०%)



कु. पाटील शुभम दिलीप
एस. एस.सी. (७८.२०%)



गुणगौरव समारंभा प्रसंगी व्यासपिठावर उपस्थित सर्व मान्यावर मंडळी



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. श्री. प्रभाकर गावंड (माजी प.स. सदस्य) यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. चौधरी सर



वार्षिक स्नेहसंमेल प्रसंगी कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे मा. श्री. प्रभाकर गावंड, शाळा समितीचे सदस्य व मुख्याध्यापक श्री. भोईर सर.